आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१ जुलै २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्र सरकारकडून रोजगार निर्मितीला चालना देणाऱ्या सवलत योजनेची घोषणा, नव्या क्रीडा धोरणालाही केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- अधिक व्याजदराचं आमिष दाखवणाऱ्या फसव्या योजनांच्या तपासणीसाठी पोलिसांची विशेष मोहीम, बीड लैंगिक अत्याचार प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- तामिळनाडूत फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात आठ जणांचा मृत्यू, पाच जण जखमी

**आणि**

- थायलंडच्या प्रधानमंत्र्यांचं घटनात्मक न्यायालयाकडून निलंबित

<><><><>

**<u>UNION CABINET DECISIONS/ पूल /प्रज्ञा</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं आज रोजगाराशी संलग्न सवलत योजनेला मंजुरी दिली. या अंतर्गत पहिल्यांदाच नोकरी करणाऱ्यांना १५ हजार रुपयांपर्यंतची रक्कम मिळेल. १ कोटी ९२ लाख युवकांना याचा लाभ मिळेल, अशी आशा माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याविषयी माहिती देताना व्यक्त केली. त्यांना कामावर ठेवणाऱ्या कंपन्यांना दरमहा ३ हजार रुपये या प्रमाणे २ वर्ष मदत मिळेल. उत्पादन क्षेत्रातल्या कंपन्यांना आणखी दोन वर्षांसाठी हे अनुदान मिळेल. यामुळं अडीच कोटींहून अधिक रोजगार निर्माण होण्याची आशा वैष्णव यांनी व्यक्त केली.

केंद्रीय मंत्रिमंडळानं एक लाख कोटी रुपयांच्या निधीसह संशोधन विकास आणि नवोन्मेष योजनेलाही मंजुरी दिली. याशिवाय राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ ला देखील आज केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- होल्ड व्हाइस कास्ट-**

*ट्रेनिंग, कोचिंग आणि खेळाडूंना सर्वांगीण पाठबळ यासाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उभारणं हे या धोरणाचं प्रमुख वैशिष्ट्य आहे. नव्या क्रीडा धोरणात लहान वयातल्या प्रतिभावान खेळाडूंना शोधून त्यांच्या गुणवत्तेला आकार देण्यासाठी काम केलं जाईल. ग्रामीण आणि शहरी भागात क्रीडा पायाभूत सुविधांचा विकास करणं तसंच स्पर्धात्मक लीग आणि स्पर्धा सुरू करण्यावर या धोरणाचा भर आहे. महिला, आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग, आदिवासी आणि दिव्यांगांचा सहभाग वाढवण्यासाठी उपक्रम सुरू केले जाणार आहेत. देशी आणि पारंपरिक खेळांना नवसंजीवनी देत क्रीडा क्षेत्रात करिअरच्या संधी निर्माण करण्याला चालना दिली जाईल. या अंतर्गत शाळा, महाविद्यालयं आणि कामाच्या ठिकाणी तंदुरुस्ती निर्देशांक लागू करण्यात येणार आहे.*

**<><><>**

आठ वर्षांपूर्वी लागू झाल्यापासून जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा करानं भारताच्या आर्थिक क्षेत्राला नव्यानं आकार दिला असून ही एक महत्त्वाची आर्थिक सुधारणा ठरली आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. त्यामुळे लघु आणि मध्यम उद्योगांसाठी व्यवसाय करणं सोपं झाल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. देशातल्या बाजारांना जोडण्यासाठी राज्यांना समान भागीदार बनवून खऱ्या अर्थात सहकारी संघराज्यात्मक चळवळीला जीएसटीनं चालना दिली असून आर्थिक विकासासाठी शक्तिशाली इंजिन म्हणून जीएसटी काम करत आहे, असं ते म्हणाले.

**<><><>**

राज्यात अधिक व्याजदराचं आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस विभागामार्फत विशेष मोहीम राबवण्यात येत असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या योजनांना बळी न पडता योग्य ती दक्षता घ्यावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केलं. नागरिकांनी गुंतवणूक करताना संबंधित संस्थेकडे आवश्यक परवाने, नोंदणी आणि अधिकृत मंजुरी याची खातरजमा करावी, असं ते म्हणाले.

बीड इथल्या अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी अर्थात विशेष तपास पथक स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केली.

मुंब्रा इथं  अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार आणि तिची निर्घृण हत्या ही घटना अत्यंत हृदयद्रावक असून, या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

<><><>

तामिळनाडूतल्या सत्तूर विरुधु नगर जिल्ह्यात आज फटाकाच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात आठ जणांचा मृत्यू झाला तर पाच जण जखमी झाले आहेत. या कारखान्यात ५० हून अधिक कामगार काम करत होते. अग्निशमन दलाने ढिगाऱ्यातून कामगारांना बाहेर काढलं असून जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तर गंभीर जखमींना एक लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपये नुकसानभरपाई देण्यात येईल.

<><><>

तेलंगणातल्या संगारेड्डी जिल्ह्यात पाशमा-इलाटम या औषधनिर्माण कारखान्यात काल झालेल्या स्फोटातल्या मृतांची संख्या ३६ झाली आहे. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी आज दुर्घटना स्थळाला भेट दिली. याप्रकरणाची सखोल चौकशी करत त्याचा अहवला देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना केल्या आहेत. रुग्णालयात जाऊन जखमींचीही भेट घेत विचारपूस केली. दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबाला एक कोटी रुपये, जखमींना दहा लाख रुपये आर्थिक मदतीची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

<><><>

उत्तराखंडमध्ये यमुनोत्री धामच्या जानकीचट्टी गावात अडकून पडलेल्या राज्यातल्या नागरिकांची NDRF नं सुटका केली आहे.  २८ जूनपासून इथं राज्यातले सुमारे दीडशे पर्यटक अडकून पडले होते. त्यांच्या मदत पोहचवण्याची विनंती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तराखंड सरकारकडे केली होती.

<><><>

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण यांची आज बिनविरोध निवड झाली. मुंबईतल्या वरळीत झालेल्या प्रदेश अधिवेशनात केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी ही

घोषणा केली. या घोषणेनंतर मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून रविंद्र चव्हाण यांनी प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतली. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

<><><><>

बंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांचं निलंबन रद्द करावं, असे आदेश केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणानं दिले आहेत. गेल्या महिन्यात बंगळुरू इथल्या चिन्नास्वामी मैदानाबाहेर झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी कर्नाटक सरकारनं हे निलंबनाचे आदेश दिले होते. वरिष्ठ भारतीय पोलिस सेवा अधिकारी विकास कुमार यांच्या निलंबनाचे आदेश रद्द केले आहेत. ही कारवाई पुरेशा आणि ठोस तथ्यांवर आधारित नाही, असं मत न्यायमूर्ती संतोष मेहरा आणि न्यायमूर्ती आर के श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखालील पीठानं या सुनावणीदरम्यान व्यक्त केलं.

<><><><>

थायलंडच्या प्रधानमंत्री पेंतोग-टार्न शिनावात्रा यांना तिथल्या घटनात्मक न्यायालयानं निलंबित केलं आहे. कंबोडियाचे माजी प्रधानमंत्री हुस सेन यांच्याशी झालेलं दूरध्वनी संभाषण उघड झाल्यानंतर ही कारवाई झाली. याप्रकरणी ३६ सिनेटरनी दाखल केलेली याचिका स्वीकारली असल्याचं न्यायालयानं जाहीर केलं आहे. या याचिकेत शिनावात्रा यांनी संविधानानुसार नैतिक मानकांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. न्यायालयाचा अंतिम निकाल येईपर्यंत थायलंडचे उपप्रधानमंत्री काळजीवाहू प्रधानमंत्री म्हणून कामकाज पाहतील.

<><><><>

भारत आणि पाकिस्तानमध्ये आज परस्परांच्या ताब्यात असलेले नागरिक आणि मच्छिमारांच्या नावांच्या यादीची देवाणघेवाण झाली. भारताच्या ताब्यात ३८२ पाकिस्तानी नागरिक आणि ८१ मच्छिमार आहेत, तर पाकिस्तानकडे ५३ नागरिक आणि १९३ मच्छिमार आहेत. या सर्वांसह पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या बेपत्ता भारतीय संरक्षण कर्मचाऱ्यांचीही लवकर सुटका करण्याची मागणी परराष्ट्र मंत्रालयाने केली आहे. मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सरकारच्या प्रयत्नांमुळे गेल्या ११ वर्षांत पाकिस्तानातून २ हजार ६६१ भारतीय मच्छिमार आमि ७१ भारतीय नागरिकांना मायदेशी परत आणण्यात यश आलं आहे.

<><><><>

तुर्कीच्या इझमीर शहरात भ्रष्टाचार, फसवणूक आणि निविदा प्रक्रियेत गैरव्यवहारप्रकरणी आज धडक कारवाई झाली. या कारवाईत १५७ जणांना अटक झाली असून त्यात विरोधी पक्षांचे सदस्य तसंच इझमिरचे माजी महापौर टुनक सोयेर यांचा समावेश आहे. विरोधकांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या इझमिरमध्ये ही कारवाई झाली आहे.

<><><><>

महिला क्रिकेटमधे आज रात्री इंग्लंडमधल्या ब्रिस्टल इथल्या काऊंटी मैदानावर भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या पाच सामन्यांच्या मालिकेतला दुसरा टी २० सामना रंगणार आहे. पहिल्या सामन्यात भारतानं इंग्लंडचा ९७ धावानं पराभव करत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

<><><><>

पंजाबचा तेगबीर सिंह रशिया आणि युरोप खंडातलं माऊंट एल्ब्रुस हे शिखर सर करणारा सर्वात कमी वयाचा गिर्यारोहक ठरला आहे. माऊंड एल्ब्रुसची उंची १८ हजार ५१० फूट इतकी असून जगातल्या दहा उंच शिखरांपैकी ते एक आहे. ६ वर्षे नऊ महिने आणि चार दिवसांचा असताना त्यानं ही कामगिरी केली.

<><><><>

उझबेकिस्तानमधल्या ताश्कंद इथं झालेल्या २९ व्या आशियाई टेबल टेनिस युवा स्पर्धेत भारताच्या दिव्यांशी भौमिक हिनं १५ वर्षांखालील मुलींच्या एकेरी गटात सुवर्णपदक पटकावलं. अंतिम फेरीत तिनं चीनच्या झू कि ही हिला ४-२ असं पराभूत केलं. या विजयामुळे टेबल टेनिसच्या जागतिक युवा अजिंक्यपद स्पर्धेसाठी दिव्यांशीची निवड झाली आहे.

//<><><><>//